संमेलन आणि तदनुषंगाने सर्वश्री लाडखेडकर, विडे, निर्मळदादा, गाडगीळ, सार्दो यांनी आपले विचार मांडले आहेत. मला जास वाटते ते थोडक्यात लिहीत आहे.

संमेलन हा प्रकार: सोहळा आहे. त्यामध्ये जुन्या मित्रांच्या भेटी-गाठी, गप्पा-चर्चा, नवीन मित्र जोडणे, नव्या लोकांना पक्षी-निरीक्षणात ओढणे, सर्वांना ज्या गोष्टी पटल्या आहेत, त्यावर एकत्रित संख्येने जोर देणे, ज्यांनी काही विशेष कामगिरी वा कौशल्य दाखविले असेल, त्यांची इतरांना माहिती करून देणे व काही काळ सर्वांनी आनंदात घालविणे, इत्यादि प्रकार अपेक्षित असतात. यापेक्षा मौलिक गोष्टींची संमेलनातून अपेक्षा करू नये.

आतापर्यंत स्थानिक मंडळींच्या पुढाकाराने ठिकठिकाणी संमेलने भरली. यापुढेही जोराने असा लोकांचा पुढाकार असल्याचे जाणवले नाही. असा जोराचा पुढाकार कोणी घेत असेल तर अजूनही असे संमेलन होऊ शकेल. लोकांना सोहळा जरूर व्हावा.

इतर मौलिक गोष्टींसाठी उदा. पक्षी-निरीक्षणातील बारकावे, काही विशिष्ट गोष्टींची माहिती देणे-घेणे, एकत्रित करणे, नवीन संशोधन व त्यावर चर्चा, यासाठी वेगवेगळी शिबिरे भरविण्याचे आपण ठरविले होते. डॉ. सावंत तसे पहिले शिबीर घेणार होते. दुर्दैवाने ते झाले नाही. पण अजून होऊ शकते. लाडखेडकर व सार्दो यांनी तशी तयारी दर्शविली आहे. मात्र या शिबिरात संघटनात्मक बाबींची चर्चा न करता, पक्षी-निरीक्षण कसे सुधारता येईल, महाराष्ट्रातील पक्ष्यांबद्दल माहिती कशी एकत्र होईल, नवीन संशोधन कोणते आणि कोणकोण करणार आहे, यावरील माहितीची देवाण-घेवाण कशी होईल, ही चर्चा करावी. महाराष्ट्रातील कोणत्या पक्ष्यांबद्दल, कोणत्या प्रकारची माहिती आपल्याजवळ नाही, याची एक यादी मी प्रसारित केली आहे. शिबिरात येणाऱ्यांनी आपल्याजवळ जी माहिती आहे ती बरोबर घेऊन यावे म्हणजे ती शिबिरातच एकत्रित होऊन महाराष्ट्रातल्या पक्ष्यांविषयीचे संकलन सुरू होईल. पर्यावरणाच्या इतर प्रश्नांबाबतही समान भूमिका या शिबिरात तयार व्हावी.

प्रकाश गोळे